**CCE PF**
**REVISED**

ಕರ್ನಾಟಕ ಪ್ರೌಢ ಶಿಕ್ಷಣ ಪರೀಕ್ಷಾ ಮಂಡಳಿ, ಮಲ್ಲೇಶ್ವರಂ, ಬೆಂಗಳೂರು – 560 003

**KARNATAKA SECONDARY EDUCATION EXAMINATION BOARD, MALLESWARAM, BANGALORE – 560 003**

ಎಸ್.ಎಸ್.ಎಲ್.ಸಿ. ಪರೀಕ್ಷೆ, ಮಾರ್ಚ್/ಏಪ್ರಿಲ್, 2018

**S. S. L. C. EXAMINATION, MARCH/APRIL, 2018**

ಮಾದರಿ ಉತ್ತರಗಳು

# MODEL ANSWERS

ದಿನಾಂಕ : 23. 03. 2018 ]   ಸಂಕೇತ ಸಂಖ್ಯೆ : **08-M**

Date : 23. 03. 2018 ]   **Code No. : 08-M**

## ವಿಷಯ : ಪ್ರಥಮ ಭಾಷೆ — ಮರಾಠಿ

## Subject : First Language — MARATHI

**( ಹೊಸ ಪಠ್ಯಕ್ರಮ / New Syllabus )**

**( ಖಾಸಗಿ ಅಭ್ಯರ್ಥಿ / Private Fresh )**

[ ಗರಿಷ್ಠ ಅಂಕಗಳು : 125

[ Max. Marks : 125

| **प्रश्न क्रमांक** | **अचूक उत्तरे** | **गुण** |
|---|---|---|
| | **विभाग - A** | |
| | **( गद्य व पद्य पाठ्यांशावर आधारीत )** | |
| I. | एका वाक्यात उत्तरे लिहा : ( बरोबर उत्तरास 1 गुण देणे ) : 16 × 1 = 16 | |
| 1. | वसईचा सरसुभा अखेर चिमाजी अप्पांनी कोणाकडे सोपविला ? | |
| | **उत्तर :** शंकराजी केशव फडके | 1 |
| 2. | स्वतंत्र भारताच्या पहिल्या मंत्रिमंडळाच कायदामंत्री कोण होते ? | |
| | **उत्तर :** डॉ० बाबासाहेब आंबेडकर | 1 |
| 3. | डॉ० बाबासाहेब आंबेडकरांचे दुसरे दैवत कोणते ? | |
| | **उत्तर :** विनय | 1 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 4. | सावित्रीबाई ज्योतिबांना कोणत्या नावाने संबोधत ?<br>**उत्तर :** शेटजी | 1 |
| 5. | 'क्रांती ज्योती सावित्रीबाई' या पाठाचा वाङ्मयप्रकार कोणता ?<br>**उत्तर :** एकपात्री प्रयोग | 1 |
| 6. | सातवी पास झाल्यावर उत्तम कांबळे पुढील शिक्षणासाठी कोणत्या गावी गेले ?<br>**उत्तर :** रायबाग | 1 |
| 7. | गंगूबाई हनगलांनी कोणत्या घराण्याची गायकी परदेशात लोकप्रिय केली ?<br>**उत्तर :** किराणा | 1 |
| 8. | धारवाडच्या राष्ट्रीय विद्यालयाचे मुख्याध्यापक कोण होते ?<br>**उत्तर :** द० रा० बेंद्रे | 1 |
| 9. | 'विरहिणी' म्हणजे काय ?<br>**उत्तर :** देवाच्या विरहाने आर्त झालेल्या भक्ताच्या अवस्थेचे वर्णन करणारी काव्यरचना | 1 |
| 10. | भागवत संप्रदायाची स्थापना कोणी केली ?<br>**उत्तर :** संत ज्ञानेश्वर | 1 |
| 11. | भुकेलेली पोरे कशी धावतात ?<br>**उत्तर :** सैरावैरा | 1 |
| 12. | 'मनाचे पिंजरे' हा पाठ कोणत्या पुस्तकातून निवडला आहे ?<br>**उत्तर :** उघड्या खिडक्या | 1 |
| 13. | डॉ० रविंद्र कोल्हे व त्यांच्या पत्नी कोणत्या भागात समाजसेवा करीत आहेत ?<br>**उत्तर :** सातपुड्याच्या दुर्गम भागातील बैरागड | 1 |
| 14. | लोकसाहित्यात माहेरचा दूत असे कोणाला मानले आहे ?<br>**उत्तर :** कावळा | 1 |
| 15. | मगध देशाचा शिशुपालाच्या मदतीस आलेला राजा कोण ?<br>**उत्तर :** जरासंध | 1 |
| 16. | धरण बांधणारी स्त्री पाटी खाली काय झाकते ?<br>**उत्तर :** तान्हं लेकरु. | 1 |

<table>
<tr><th>प्रश्न क्रमांक</th><th>अचूक उत्तरे</th><th>गुण</th></tr>
<tr><td>II.</td><td>तीन ते चार वाक्यात उत्तरे लिहा : 13 × 2 = 26</td><td></td></tr>
<tr><td>17.</td><td>डोळस माणसाने आंधळ्यांना कसे समजावले ?<br>उत्तर : हा हत्तीचा एकेक अवयव झाला, हा सगळा हत्ती नव्हे. अशा सर्व अवयवांनीयुक्त तो हत्ती होय.</td><td>2</td></tr>
<tr><td>18.</td><td>बाल परवेशी आणि नाना परवेशी म्हणजे काय ?<br>उत्तर :<br>बालपरवेशी : – लढाईत मरण पावलेल्या सैनिकांच्या मुलांच्या संगोपनासाठी दिलेला बैठा पगार, जमीन म्हणजे बालपरवेशी. 1<br>नानापरवेशी : – लढाईत मरण पावलेल्या संततीहीन पत्नीस तिच्या निर्वाहा पुरता दिलेला पगार, जमीन म्हणजे नानापरवेशी. 1</td><td>2</td></tr>
<tr><td>19.</td><td>''तू मरत का नाहीस ? कशाला जगतोस भुईला भार होऊन'' संदर्भासह स्पष्टीकरण द्या.<br>उत्तर :<br>संदर्भ : – पाठाचे नाव – आई समजून घेताना<br>लेखक – उत्तम कांबळ<br>आईने अण्णास म्हटले. 1<br>स्पष्टीकरण : – अण्णाने दारु सोडावी, कामाला जावे, पैसे कमवून संसारासाठी वापरावे, घर बांधावे, पोरांना कपडे द्यावे असे आक्काला वाटे, पण असे काहीच घडत नसल्याने वैतागून वरील वाक्य आक्का म्हणते. 1</td><td>2</td></tr>
<tr><td>20.</td><td>केशवकुमार यांचा थोडक्यात परिचय लिहा.<br>उत्तर : केशवकुमार – पूर्ण नाव – प्रल्हाद केशव अत्रे<br>साहित्य संपदा – मी उभा आहे, लग्नाची बेडी, भ्रमाचा भोपळा, उद्याचा संसार, साष्टांग नमस्कार, तो मी नव्हेच ( नाटके )<br>कऱ्हेचे पाणो ( आत्मचरित्र ), झेंडूची फुले ( विडंबन काव्य संग्रह ) 'श्यामची आई' चित्रपटास पहिला राष्ट्रपती पुरस्कार. नाशिक येथील अ.भा. साहित्य सम्मेलनाचे अध्यक्ष.</td><td>2</td></tr>
</table>

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | | गुण |
|---|---|---|---|
| 21. | गुराख्याच्या जीवाची आग का होते ? आणि त्यानंतर तो काय करतो ? | | |
| | **उत्तर :** खंडीभर ढोरामागे धावताना लहानसा जीव मेटाकुटीस येतो. जेव्हा गाई गुरे पांगतात तेव्हा रागाने गराख्याच्या जीवाची आग होत. | 1 | |
| | दात ओठ खाऊन तो गुरांच्या पाठीवर काठीने प्रहार करतो. | 1 | 2 |
| 22. | ग्रामीण भागातील स्त्रियांना कोणती जीवट सवय असते ? | | |
| | **उत्तर :** कणी कोंडा पाखडून त्यातील नेमके सत्व उचलण्याची जीवट सवय ग्रामीण स्त्रियांना असते. जे मिळेल ते खाऊन सर्व प्रकारचे कष्ट सोसूनही त्या आनंदी व समाधानी असतात. | | 2 |
| 23. | ''तुम्ही त्यांशी कशासाठी भांडता ?'' संदर्भासह स्पष्टीकरण द्या. | | |
| | **उत्तर :** | | |
| | **संदर्भ : –** पाठाचे नाव – वसईचा वेढा<br>लेखक – कृष्णाजी विनायक सोहनी<br>फिरंग्याच्या पत्नीने नवऱ्याला उद्देशून म्हटले आहे. | 1 | |
| | **स्पष्टीकरण : –** फिरंग्याची बायको जहाजातून जात असता चिमाजी अप्पांच्या सरदारांनी तिला धरुन आणली. तेव्हा चिमाजी अप्पांनी साडी, चोळी नेसवून तिची पाठवणी केली. तेव्हा माघारी जाऊन नवऱ्यास वर्तमान सांगताना वरील वाक्य म्हटले आहे. | 1 | 2 |
| 24. | दैवी शक्ती कोणती ? आणि त्या जोरावर आंबेडकरांनी काय मिळविले ? | | |
| | **उत्तर :** आत्मविश्वास ही दैवी शक्ती होय. त्याच्या जोरावर त्यांनी इंग्लंडमध्ये असताना ज्या अभ्यासक्रमाला 8 वर्षे लागतात तो अभ्यासक्रम त्यांनी 2 वर्षे 3 महिन्यात यशस्वी तऱ्हेने पूर्ण केला. | | 2 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 25. | तात्यांच्या जवळ किती एकर जमीन होती ? व त्यांनी ती कशी मिळविली होती ?<br>**उत्तर :** तात्यांजवळ सत्तावीस एकर जमीन होती. 1<br>त्यातली निम्म्याच्यावर जमीन गणा तात्यांनी स्वतः कमावलेली होती. त्यासाठी त्यांनी कष्टांची तमा बाळगली नव्हती किंवा कधी हौस मौज केली नव्हती. 1 | 2 |
| 26. | सावित्रीबाईंचे जन्मगाव कोणते ? त्यांची आई त्यांना काय म्हणायची ?<br>**उत्तर :** सातारा जिल्ह्यातील खंडाळा तालुक्यातलं 'नायगाव' हे सावित्री बाईंचे जन्मगाव. 1<br>त्यांची आई म्हणायची ''भाकरी टाकायला शिका आता, मोठी झालीस नव्हं तू. कारटे ! आता लगीन करायला हवं तुझं'' 1 | 2 |
| 27. | पाहुण्यांची वर्तणूक कशी आहे ?<br>**उत्तर :** पाहुणे आपलेच घर असल्याप्रमाणे वागतात. स्वयंपाक घरातील डबा उघडून राजरोसपणे पदार्थ काढून फस्त करतात. बाबांच्या पेटीतून विड्यांचे जुडगे पळवितात. बरेच दिवस ठाण मांडून राहतात. | 2 |
| 28. | ''कुणी एखादी पारु, कुणी एखादी राही'' संदर्भासह स्पष्टीकरण द्या.<br>**उत्तर :**<br>**संदर्भ : –** कवितेचे नाव – सुन्या तिच्याही दाही दिशा<br>कवयित्री – अनुराधा पाटील. 1<br>ग्रामीण स्त्रीची व्यथा मांडताना तिच्या बद्दल म्हटले आहे.<br>**स्पष्टीकरण : –** ग्रामीण भागातील स्त्रिया न संपणारे काबाडकष्ट, हाल अपेष्टा सोसूनही आशावादी असतात. काही स्त्रिया कंटाळून विहीर जवळ करतात पण काही मन मारुन आशेवर जगत असतात. त्यांच्या विषयी कवयित्री वरील उदगार काढते. 1 | 2 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 29. | भुकेलेले जीव काय करतील असे विंदा म्हणतात ?<br>**उत्तर :** भुकेलेले जीव अन्न मिळविण्यासाठी सैरावैरा धावू लागतीत. एकमेकाला खाण्यासही कमी करणार नाहीत. ते विठ्ठलाला इशारा देतात की आम्ही अन्नभक्त आहोत. आम्हाला देवरक्त वर्ज्य नाही. | 2 |
| III. | पाच-सहा वाक्यात उत्तरे ( उत्तराचे मुद्दे ) : $10 \times 3 = 30$ | |
| 30. | चिं. वि. जोशींच्या घरी काकूबाईंचे आगमन कसे झाले ? त्या आल्याबरोबर मुलांना काय म्हणाल्या ?<br>**उत्तर :** छकड्यातून आगमन — दोन ट्रंका सतरंजीत बांधलेली वळकटी — पाण्याचा खुजा — बाजाची पेटी पोपटाचा पितळी पिंजरा — बोक्याचे डोके-डाव्या बगलेत — आजीबाई विराजमान $1\frac{1}{2}$<br>"काय बाई, चावट पोरं आहेत ही ? मी काय म्हातारी बितारो आहे आजीबाई म्हणवून घ्यायला ? मला काकूबाई म्हणत जा, पण जर का आजीबाई म्हटलतं तर जळता निखारा लावीन जिभेला." $1\frac{1}{2}$ | 3 |
| 31. | पावसाळ्याचा हिशेब अनंत काणेकर कसा घालतात ?<br>**उत्तर :** पावसाळा अदमासे चार महिने म्हणजे एकशेवीस दिवस. साठ दिवस पाऊस त्यातून तीस दिवस रात्रीचा पडतो. राहिले तीस दिवस. घरात किंवा कामाच्या ठिकाणी पंधरा दिवस जातात. राहिले पंधरा. जाता येता आडोशाला थांबू शकतो. सात दिवस जातात उरले आठ. आपण जायला यायला आणि पाऊस पडायला असा योग फार तर चार वेळा — चार महिन्यातून चार वेळा छत्रीचा उपयोग. | 3 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 32. | शिक्षणामुळे आदिवासी मुलांच्यात कोणते परिवर्तन झाले ?<br>**उत्तर :** शिक्षणामुळे आचार विचारात बदल नाही.<br>35 / 40 गुणांचा महाविद्यालयीन प्रवेशासाठी उपयोग नव्हता. नवचैतन्याऐवजी नैराश्य मरगळ — शेतात काम करायची लाज — बाह्य पोशाखात बदल — अर्धी चड्डी गंजीफ्राकऐवजी जीनची पँट, पूर्ण बाह्याचा शर्ट तोंडात गुटखा आणि डोळ्यावर गॉगल लावून हिंडत. शहरात तात्पुरती मोलमजुरी करून चैन करायला शिकली. | 3 |
| 33. | वाटणीच्या घोळाने घरात काय घडत होते ? गणातात्यांना धाकट्या मुलाचा राग का आला ?<br>**उत्तर :** घरातील कटकटीत वाढ. शेतात कामाचा खोळंबा. चूल बंद पडे. आठ दिवस धुसपूस वाढली. वाटणीचा घोळ सहा महिने सुरु. दोन भाऊ आखाड्यात उतरल्याप्रमाणे एकमेकांकडे पहात. $1\frac{1}{2}$<br>धाकट्याने लंगोटीभर जमिनीचा अनेकदा उल्लेख — सत्तावीस एकर जमीन गणातात्यांनी कष्टाची तमा न बाळगता कमावली. कधी हौस मौज केली नाही. धाकट्याने हेटाळणीने उल्लेख केल्यामुळे राग. $1\frac{1}{2}$ | 3 |
| 34. | श्रीकृष्णाच्या प्राप्तीसाठी रुक्मिणीने काय केले ? आणि प्राप्ती न झाल्यास ती काय करणार आहे ?<br>**उत्तर :** श्रीकष्णाच्या प्राप्तीसाठी व्रतवैकल्ये व नियम धरले. देव गुरु व ब्राह्मणांची पूजा केली. दारी आलेल्या याचकास विन्मुख पाठविले नाही. पुण्य मिळविले. $1\frac{1}{2}$<br>प्राप्ती न झाल्यास जीभ हासडून ती जीव देणार. पुढे शंभर जन्म घेऊन उग्र तपश्चर्या करुन भगवान शंकरही ज्याला वंदन करतो त्याचे चरण मिळविणार आहे. $1\frac{1}{2}$ | 3 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 35. | ढोंगी गुरु भक्तीचे अवडंबर कसे माजवितात ?<br>**उत्तर :** जटा वाढविणे, अंगाला भस्म फासणे, संसारातून विरक्त होऊन मठाची उठाठेवकरणे, मनात भाव नसताना हरिनाम घेणे, गळ्यात तुळशी व रुद्राक्ष माळा घालणे, शुद्धतेचे आचरण नसणे, होमात तीळ, तांदूळ, तूप जाळणे. दंड कमंडलू घेऊन ढोंगी वागणे असे अवडंबर माजवितात. | 3 |
| 36. | पृथ्वीला आपल्याकडे आकर्षित करण्यासाठी कोण कोण व कसे प्रयत्न करीत आहेत ?<br>**उत्तर :**<br>**तारे** — दिमाखात नटूनथटून पृथ्वीवर उल्कारूपी फुले टाकतात.<br>**चंद्र** — सूर्याचे उसने तेज घेऊन घोर तप करतो.<br>**शुक्र** — पहाटेच्या वेळी प्रभेचा पिसारा फुलवून प्रेमाची याचना.<br>**मंगळ** — लाजून लाल होऊन प्रेमाची याचना करतो.<br>**ध्रुव** — उत्तरेकडे संन्याशाप्रमाणे तपाचरण.<br>**धूमकेतू** — वेड्याप्रमाणे केस पिंजारुन प्रेमाची आर्जवे करतो. | 3 |
| 37. | धरण बांधणाऱ्या स्त्रीच्या कष्टाचे तुमच्या शब्दात वर्णन करा.<br>**उत्तर :** पहाटे लवकर उठून धान्य दळते. दिवस वर आला की कामाला जाते. तान्हया बाळाला पाटी-खाली झाकून ठेवते. उन्हाच्या झळा सोसते. पाय भाजू नयेत म्हणून पायाला झाडपाला बांधते. घोटभर पाण्यासाठी रानोमाळ भटकते. तिच्या कष्टावर श्रीमंत लोक ऐष आरामात राहतात. | 3 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 38. | अब्दुल करीम खाँ व गंगूबाईंची भेट कशी झाली ? त्यांनी कोणते उद्गार काढले ?<br><br>**उत्तर :** गंगूबाईंच्या आई अंबाबाई उत्तम कर्नाटकी संगीत गात. अनेक लग्न समारंभात त्यांच्या गाण्याचे जलसे होत. किराणा घराण्याचे संस्थापक अब्दुल करीम खाँ यांनीही त्यांचे गाणे ऐकून दाद दिली होती. एकदा ते घरो आले असता गंगूबाईही तेथे होत्या तेव्हा त्यांनी गंगूबाईना विचारले "तूही गातेस वाटतं ?" तेव्हा गंगूबाईंनी मान हलविलो. व त्यांना पद म्हणून दाखविले. त्या नाजूक मुलीचा आवाज व ढंग पाहून खाँसाहेब उद्गारले. "बहुत अच्छा बेटी ! अब खूब खाना और बहुत गाना." | 3 |
| 39. | नेनंता गुराखी कृष्ण होऊ शकला नाही असे कवी का म्हणतो ?<br><br>**उत्तर :** नेनंता गुराखी दुसऱ्यांची गुरे चारण्यासाठी घेऊन जातो. परंतु त्याच्या घरची परिस्थिती अत्यंत गरीब आहे. त्याच्या आईला वाटते की मुलगा दमून भागून आलेला आहे त्याला गरम गरम दूध भात खाऊ घालावा. पण ती तो देऊ शकत नाही. श्रीकृष्णाला जसे गोकुळात मुबलक दही दूध लोणी खाण्यास मिळाले. तसे या नेनंता गुराख्यास मिळू शकत नाही म्हणून गुराखी कृष्ण होऊ शकला नाहो असे कवी म्हणतो. | 3 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| IV. | खालील प्रश्नांची उत्तरे आठ-दहा वाक्यात लिहा : $5 \times 4 = 20$ | |
| 40. | 'गृहिणी मंडळ' ( हाऊस वाईव्हस ) या संस्थेबद्दल सविस्तर माहितो लिहा.<br>**उत्तर :** गृहिणी मंडळ ( हाऊस वाईव्हस )<br>स्थापना — 1948<br>खूण — लाकडाचा हात<br>वर्गणी जमवून सहा मजली इमारत. एकेक मजल्यावर पुष्परचना, हस्तव्यवसाय, आहारशास्त्र, गृहरचना स्वयंपाक यांचे वर्ग. बाजारहाट कसा करावा, नकलो वस्तूंपासून सावध — मिळणाऱ्या पैशात बजेट याचे ज्ञान. 5 व्या मजल्यावरील प्रयोग शाळेत भेसळ तपासणी. दूध, तूप कापड कसून पाहणी. भेसळयुक्त वस्तूंवर बहिष्कार-सरकार चळाचळा कापतं. | 4 |
| 41. | 'हिरवे सांगाती' या पाठात पिंपळ, जांभूळ, कडुनिंब या झाडांविषयी गुलजार काय सांगतात ?<br>**उत्तर :**<br>**पिंपळ:** पुरातन वृक्ष. मानवी शरीरातील रेणूंशी मिळते जुळते रेणू. औषधी उपयोग. पूर्वजांनो देवाचे स्वरूप. वाटसरुला सावली. पानाचा उपयोग खेळात. कुल्फीसाठी व खोटे विडे म्हणून व्हायचा. $1\frac{1}{2}$<br>**जांभूळ:** लहानपणीचा गारवा. घरातील वयस्कर व्यक्तीप्रमाणे. कडक उन्हात सावलीत खेळ. आजोबांजवळ खेळतात म्हणून घरचे निर्धास्त. दोन्ही हात पसरुन आशोर्वाद. $1\frac{1}{2}$<br>**कडूनिंब:** पांढऱ्या पिवळसर फुलांना पाहून शैलेंद्र यांच्या गीताची आठवण. पांढरी पिवळी फुले म्हणजे झुमकेच. 1 | 4 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 42. | कवी यशवंतानी कृष्ण, कर्ण, सौभद्र व मार्कंडेय यांचे दाखले का दिलेले आहेत ? ते स्पष्ट करा.<br>**उत्तर :**<br>**कृष्ण:** युद्ध भूमीवर गोंधळलेल्या अर्जुनास युद्धासाठी प्रवृत्त केले. भरकटलेल्या समाजाला योग्य दिशा दाखविण्याचे हेच कार्य द्रष्ट्या विचारवंतांनी केले. 1<br>**कर्ण:** रथाचे चक्र भूमीत फसले तरी कर्ण शौर्याने लढला व त्याला मत्यू आला. त्याच प्रमाणे युद्धात बलिदान देणारे सैनिक. 1<br>**सौभद्र:** अर्जुन अन्यत्र युद्धात गुंतलेला असताना चक्रव्यूव्ह भेदून अभिमन्यू गेला व बलिदान दिले. तसेच समाज सेवेची आसक्ती असलेले समाजसेवक तन, मन, धन समाजास अर्पितात. 1<br>**मार्कंडेय:** देश हाच ज्यांचा देव. मार्कंडेयाप्रमाणे ज्यांनी काळालाही जिंकले आहे. असे मृत्युंजय देशभक्त. 1 | 4 |
| 43. | संत तुकडोजींना त्यांच्या स्वप्नातील भारतात कोणकोणत्या गोष्टी अपेक्षित आहेत ?<br>**उत्तर :**<br>भारतातील लोक आनंदाने गुण्यागोविंदाने नांदावेत. जात, पंथ, धर्म, संप्रदाय असा भेदभाव नसावा. गरीब, श्रीमंत, उच्च-नीच, हिंदू-मुस्लीम, शीख-ईसाई एक मताने रहावेत. मानवता धर्म सर्वांना कळावा. सर्व जाती धर्माची एकच प्रार्थना व्हावी. येथील तरुण उद्योगी व शीलवान असावा. भीती नष्ट होऊन घराघरात सौंदर्य रमावे. | 4 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 44. | खाली दिलेल्या कवितेच्या ओळी पूर्ण करा.<br>कोसळली ................................................<br>..............................................................<br>..............................................................<br>......................................... असे सत्कार ।।<br>**उत्तर :** कविता पूर्ण करा —<br>कोसळली सर दक्षिण उत्तर 1<br>घमघमले मातीतून अत्तर 1<br>अष्टदिशांतून अभीष्टचिंतन 1<br>घुमला जयजयकार<br>पहिल्या हिरव्या तृणपात्याचा 1<br>आज असे सत्कार. | 4 |
| | **विभाग - B**<br>**( व्याकरणावर आधारीत )** | |
| V. | योग्य पर्यायी उत्तरे : ( बरोबर उत्तरास एक मार्क द्या ) : 10 × 1 = 10 | |
| 45. | 'निरक्षर' या संधीची फोड अशी होते.<br>**उत्तर :** (ब) निः + अक्षर | 1 |
| 46. | "मधुराने सुरेख नृत्य केले" या वाक्यात हा प्रयोग आहे.<br>**उत्तर :** (ड) कर्मणी प्रयोग | 1 |
| 47. | "रियाने काकूंना चहा करुन दिला." या वाक्यात हा काळ आहे.<br>**उत्तर :** (क) भूत काळ | 1 |
| 48. | 'नाकापेक्षा ........................ ही म्हण पूर्ण होण्यास खालीलपैकी हे शब्द घालावे लागतील.<br>**उत्तर :** (ड ) मोती जड | 1 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 49. | ''ढग भरुन आले; पण पाऊस पडला नाही'' हे या प्रकारचे वाक्य आहे.<br>**उत्तर :** (क) मिश्र वाक्य | 1 |
| 50. | ''जमीन व पाणी या दोन्ही ठिकाणी वावरणारे'' यासाठी एक शब्द हा आहे.<br>**उत्तर :** (ड) उभयचर | 1 |
| 51. | 'उत्तीर्ण' याचा विरुद्धार्थी शब्द हा आहे.<br>**उत्तर :** (ब) अनुत्तीर्ण | 1 |
| 52. | ''बापरे केवढा मोठा साप.'' या वाक्यात बापरे या शब्दानंतर हे विराम चिन्ह घालावे.<br>**उत्तर :** (अ) उद्‌गारवाचक | 1 |
| 53. | ''चिंच फारच आंबट आहे'' यातील 'आंबट' या शब्दाची जात ही आहे.<br>**उत्तर :** (ब) गुण विशेषण | 1 |
| 54. | 'बोकड' या शब्दाचे स्त्रीलिंगी रूप हे आहे.<br>**उत्तर :** (ब) शेळी. | 1 |
| VI. | तिसऱ्या पदाशी जुळणारा शब्द ( बरोबर उत्तरास एक मार्क द्या ) : 4 × 1 = 4 | |
| 55. | सप्तमी : त, ई, आ : : तृतीया : ............. | |
| | **उत्तर :** ने, ए, शी. नी, ही, ई, शी | 1 |
| 56. | यथाशक्ती : अव्ययीभाव : : नवरात्र : ............. | |
| | **उत्तर :** द्विगू समास | 1 |
| 57. | भाकरी : कन्नड : : कोबी : ............. | |
| | **उत्तर :** पोर्तुगीज | 1 |
| 58. | डोळे : नयन : : पक्षी : ............. | |
| | **उत्तर :** खग, विहग, द्विज, पाखरु. | 1 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| VII. | सूचनेप्रमाणे प्रश्नांची उत्तरे ( मुद्दे ) : 3 × 2 = 6 | |
| 59. | 'सवे असता नाथा आपण प्रासादाहुनी प्रसन्न कानन' अलंकार ओळखून लक्षणे सांगा.<br><br>**उत्तर :**<br><br>**अलंकार –** व्यतिरेक 1<br><br>**व्याख्या –** उपमेय हे उपमानापेक्षा श्रेष्ठ आहे असे वर्णन जेथे आढळते तेथे व्यतिरेक अलंकार होतो. 1 | 2 |
| 60. | "वदनि कवळ घेता नाम घ्या श्रीहरीचे"<br>वरील ओळीचे गण पाडून वत्त ओळखा.<br><br>**उत्तर :**<br><br>वदनि \| कवळ \| घेता ना \| म घ्या श्री \| हरीचे<br>U U U \| U U U \| – – – \| U – – \| U – –<br>न \| न \| म \| य \| य 1<br><br>वृत्ताचे नाव – मालिनी 1<br><br>अक्षरे – 15<br><br>यती – 8 व्या अक्षरावर<br><br>गण – न, न, म, य, य. | 1 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | | गुण |
|---|---|---|---|
| 61. | खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा. | | |
| | i) भान हरपणे | | |
| | ii) हात पाय गळणे | | |
| | **उत्तर :** वाक्प्रचाराचा अर्थ : | | |
| | (i) भान हरपणे — स्वतःला विसरणे | 1 | |
| | (ii) हात पाय गळणे — हताश होणे, निराश होणे, निरुपाय होणे. | 1 | 2 |
| | अर्थ सांगणे $\frac{1}{2}$ मार्क | | |
| | वाक्यात उपयोग करणे $\frac{1}{2}$ मार्क | | |
| | ( वाक्यात वाक्प्रचाराचा उपयोग व्हावा. अर्थाचा नव्हे. ) | | |
| | **विभाग - C** | | |
| | **( लेखन व रचनावर आधारीत )** | | |
| VIII. 62. | कल्पनाविस्तार ( उत्तराचे मुद्दे ) : | 1 × 3 = 3 | |
| | (i) बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले | | |
| | (ii) शील हेच श्रेष्ठ भूषण. | | |
| | **उत्तर :** | | |
| | (i) कल्पनेचा अर्थ सांगणे ( शब्दशः अर्थ ) 1 | | |
| | (ii) उदाहरण व स्पष्टीकरण $1\frac{1}{2}$ | | 3 |
| | (iii) तात्पर्य $\frac{1}{2}$ | | |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | | गुण |
|---|---|---|---|
| IX. 63. | पत्रलेखन : ( उत्तराचे मुद्दे ) | 1 × 5 = 5 | |
| | तुमच्या शाळेत पर्यावरण दिन कसा साजरा केला या बद्दल मित्राला / मैत्रिणीला पत्राने कळवा. | | |
| | **किंवा** | | |
| | तुमच्या गल्लीतील साचलेला कचरा स्वच्छ करण्याबद्दल ग्रामपंचायत / नगरपालिकेच्या आरोग्याधिकाऱ्याकडे अर्ज करा. | | |
| | **उत्तर :** | | |
| | (i) प्रेषक पत्ता ( पाठविणाऱ्याचा पत्ता तारखेसह ) | 1 | |
| | (ii) मायना | 1 | |
| | (iii) विषय मांडणी भाषा सजावट | 2 | 5 |
| | (iv) समारोप व सही | $\frac{1}{2}$ | |
| | (v) कोणाला पत्र पाठवायचे त्याचा पत्ता | $\frac{1}{2}$ | |
| | **अर्ज** | | |
| | (i) प्रेषक पत्ता ( पाठविणाऱ्याचा पत्ता तारखेसह ) | 1 | |
| | (ii) योग्य अधिकाऱ्याचा मायना | 1 | |
| | (iii) विषय | 1 | 5 |
| | (iv) मजकूर | 1 | |
| | (v) सही व पत्ता ( कुणाला अर्ज पाठवायचा त्याचा ) | 1 | |
| X. 64. | निबंध लेखन : | 1 × 5 = 5 | |
| | (i) युवकांमधील वाढती व्यसनाधीनता | | |
| | (ii) वृक्ष आपले मित्र | | |
| | (iii) मोबाईल—शाप की वरदान. | | |
| | **उत्तर :** ( उत्तराचे मुद्दे ) | | |
| | (i) आकर्षक प्रारंभ | 1 | |
| | (ii) विषय ज्ञान | 2 | 5 |
| | (iii) भाषा सजावट ( अलंकार वगैरेचा वापर ) | 1 | |
| | (iv) शेवट. | 1 | |